# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय

## ४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६

☎ :२५६५६२३४ फॅक्स २५६५६२३४ E-Mail : ropune.dte@gmail.com

कालमर्यादा दि.२०/१२/२०१६

जा.क्र.तंशिविकापु/आस्था-१/२०१६/ 5051 दि. 17 DEC 2016

प्रति,
संचालक / प्राचार्य
सर्व शासकीय पदवी व पदविका संस्था

विषय- मा.न्यायालयाच्या आदेशानुसार सेवा नियमित करण्यात आलेल्या शासकीय अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय आणि शासकीय तंत्रनिकेतनातील कंत्राटी अधिव्याख्यात्यांची माहिती व संबंधित दस्तऐवज सादर करण्याबाबत

संदर्भ- १.शासन निर्णय क्र.ज्ञायाप्र-२०१०/प्र.क्र.११०/२०१०(ब)/तांशि-७ दि.१४/०१/२०१५
२.शासन निर्णय क्र.ज्ञायाप्र-२८१५/प्र.क्र.३४/२०१५(भाग-४)/१/तांशि-७ दि.१३/०३/२०१५
३.शासन निर्णय क्र.ज्ञायाप्र-२८१५/प्र.क्र.३४/२०१५(भाग-४)/२/तांशि-७ दि.१३/०३/२०१५
४.मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र.४/आस्था/कंत्राटी माहिती /२०१६/११७४ दिनांक ६/१२/२०१६
५.या कार्यालयाचे पत्र क्र.तंशिविकापु/आस्था-१/२०१६/४८८० दिनांक ०६/१२/२०१६
६.मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र.४३अ/आस्था/२०१६/११९३ दिनांक १५/१२/२०१६

उपरोक्त विषयान्वये या कार्यालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय पदवी व पदविका संस्थेतील ज्या कंत्राटी अध्यापकांच्या सेवा संदर्भ क्र. १ ते ३ अन्वये नियमित करण्यात आलेल्या आहेत त्यांची संदर्भ क्र.४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे माहिती विहीत प्रपत्रांत तयार करुन काही संस्थांनी ती या कार्यालयांस सादर केलेली आहे.

परंतु संदर्भ क्र.४ चे पत्रातील काही मूळ दस्तऐवज काही संस्थामार्फत या कार्यालयांस सादर करण्यात आलेले नाहीत. तसेच काही दस्तऐवज संस्थेत उपलब्ध नाहीत असे कळविलेले आहे. या संबंधित त्रुटींबाबत या कार्यालयांने वेळोवेळी लेखी / तोंडी सुचना दिलेल्या आहेत.

संदर्भ क्र.६ अन्वये मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांनी त्यांचे संदर्भ क्र.४ मधील नमूद पत्रातील सर्व दस्ताऐवज या कार्यालयांस उपलब्ध झालेबाबत प्रमाणपत्र सादर करण्याच्या सुचना या कार्यालयांस दिलेल्या आहेत. तद्नुषंगाने आपणांस कळविणेत येते की, आपण या पत्रासोबत जोडलेले प्रमाणपत्र द्विप्रतीत या कार्यालयांस दिनांक २०/१२/२०१६ पर्यंत न चुकता सादर करावे. .

तसेच संचालनालयातील दुरध्वनी संदेशानुसार पुर्वी सर्व कंत्राटी अधिव्याख्यात्यांचे Self Appraisal Report संबंधित संस्थास्तरावर ठेवणेबाबत कळविलेले होते. त्याप्रमाणे शैक्षणिक कामकाजासंबंधी ज्यांचे कोणेतेच दस्तऐवज या कार्यालयांस सादर केलेले नाहीत त्यांचे Self Appraisal Report या कार्यालयांस सादर करावेत. तसेच आपल्या कार्यालयाकडून या कार्यालयांस सादर केलेल्या सर्व कंत्राटी अध्यापकांचे रजेचे दस्तऐवज सुद्धा या कार्यालयांस सादर करणेबाबत वरीष्ठ कार्यालयांकडून सुचना देण्यात आलेल्या आहेत.

सबब उपरोक्त सर्व सुचनांचे काटेकोरपणे पालन करुन दिनांक २०/१२/२०१६ पुर्वी सर्व दस्तऐवज तसेच प्रमाणपत्र या कार्यालयांस खास दुतामार्फत सादर करावे.

(डॉ.डी.आर.नंदनवार)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- संगणक विभाग यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

Endorsement

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत शासकीय अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय आणि शासकीय तंत्रनिकेतनातील कंत्राटी अध्यापकांची सेवा –

१ .शासन निर्णय क्र.न्यायाप्र-२०१०/प्र.क्र.११०/२०१०(ब)/तांशि-७ दि.१४/०१/२०१५

२. शासन निर्णय क्र.न्यायाप्र-२८१५/प्र.क्र.३४/२०१५(भाग-४)/१/तांशि-७ दि.१३/०३/१५

३ .शासन निर्णय क्र.न्यायाप्र-२८१५/प्र.क्र.३४/२०१५(भाग-४)२/तांशि-७ दि.१३/०३/२०१५

अन्वये नियमित केलेल्या आहेत. त्या अनुषंगाने संचालनालयाचे पत्र क्र.४/आस्था/कं. अधि. माहिती / २०१६/११७४ दि.६/१२/२०१६ व या कार्यालयाचे पत्र क्र. तंशिविकापु/आस्था-१/२०१६/४८८० दिनांक ०६/१२/२०१६ या दोन्ही पत्रातील नमूद संबंधित अध्यापकांचे दस्तऐवज मूळ अथवा छायांकित प्रतीसह या कार्यालयांस सादर केलेले आहेत. या कार्यालयांस सादर केलेली माहिती ही अचूक असून ज्या अध्यापकांची मूळ कागदपत्रे अथवा कोणतीच कागदपत्रे या कार्यालयांस सादर केलेली नाहीत त्यांचे बाबत समितीमार्फत काही विचारणा झाल्यास त्यांस सर्वस्वी संस्थाप्रमुख हे जबाबदार राहतील.

संस्थाप्रमुखांचे नाव

प्रति,
मा.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

क्रमांक-
दिनांक -

Endorsement